# खापरा नदीवरील पूल गेला वाहून



## मेळघाटातील पाच गावांचा संपर्क तुटला

## दरवर्षी कोट्यवधींची कामे, तरीही निकृष्ट दर्जा

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.17 )**– चिखलदरा तालुक्यातील मेळघाटातील खापरा नदीवरील पूल बुधवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरात वाहून गेला, परिणामी खडीमल, नवलगाव, बिच्छुखेडा, माडीझडप आणि चुनखडी या पाच गावांचा संपर्क पूर्णत: तुटला आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांना दळणवळणासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

जोरदार पावसामुळे खापरा नदीला अचानक आलेल्या पुरात पुलाचे संपूर्ण संरचनाच वाहून गेली. सदर पूल पूर्वीपासूनच अत्यंत जीर्ण स्थितीत होता, याकडे नागरिकांनी वारंवार प्रशासनाचे लक्ष वेधले होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याने ही दुर्घटना घडल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. या पुलाचा वापर स्थानिक नागरिक दररोज चिखलदरा, परतवाडा, सेमाडोह आणि धारणी येथे जाण्यासाठी करत होते. पूल वाहून गेल्यामुळे या नागरिकांचे जीवनमान विस्कळीत झाले असून, कामधंदा, शिक्षण, आरोग्य सेवा यावर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

या भागात सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग तसेच पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत दरवर्षी कोट्यवधी रुपयांची कामे केली जातात. परंतु, कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याची तक्रार अनेकदा झाली आहे. रस्ते, पूल आणि इतर पायाभूत सुविधांचे बांधकाम केवळ औपचारिकतेपुरते होत असून, प्रत्यक्षात सुविधा टिकवणाऱ्या नसतात. परिणामी, पावसाळ्यात अशा दुर्घटना घडतात आणि याचा थेट फटका आदिवासी जनतेला बसतो.

या घटनेनंतर नागरिकांनी तातडीने नवीन व मजबूत पूल उभारण्याची मागणी केली आहे. दरवर्षी पूल व रस्ते वाहून जाणे ही आता वारंवार घडणारी घटना झाली असून, प्रशासन केवळ घटना घडल्यावरच सक्रिय होते, ही बाब संतापजनक असल्याचे स्थानिकांनी स्पष्ट केले. याशिवाय, अशा घटनांमुळे कुपोषणासारख्या समस्यांवर परिणाम होतो, आरोग्यसेवांमध्ये अडथळा निर्माण होतो, तसेच विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात, हे वास्तव आहे.

### दर्जाहिन बांधकामे

मेळघाटात दरवर्षी विविध योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात रस्ते व पूल बांधकामांची कामे केली जातात. मात्र दर्जा आणि देखरेख यामध्ये प्रचंड त्रुटी असल्यामुळे दरवर्षी पूल वाहून जाणे, रस्ते खचणे, संपर्क तुटणे या समस्या निर्माण होतात. याचा थेट फटका दुर्गम भागातील आदिवासी व वनवासी जनतेला बसतो. या भागात योग्य देखरेख आणि मजबूत सुविधा निर्माण करण्यासाठी सरकारने व प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

‘पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत या रस्त्याचे काम सुरु आहे. संबंधित विभागाला तात्काळ दुरुस्तीचे आदेश देण्यात आले असून, खडीमल आणि चुनखडी गावांसाठी खंडुखेडा मार्गे पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्यात येत आहे.’

**–जीवन मोरणकर,** तहसीलदार, चिखलदरा.

# स्वच्छ भारत अभियानात अमरावती महापालिकेची झेप

## ‘एक स्टार’ मानांकनासह वॉटर प्लस प्रमाणपत्राची प्राप्ती




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.17 )**– स्वच्छ भारत मिशन 2.0 अंतर्गत झालेल्या स्वच्छ सर्वेक्षण 2024 मध्ये अमरावती महापालिकेने उल्लेखनीय कामगिरी करत 12,500 पैकी 10,036 गुणांची कमाई केली आहे. या यशासह अमरावती शहराने ‘एक स्टार रँकिंग’ आणि ‘वॉटर प्लस प्रामाणिकीकरण’ प्राप्त करत राज्यात अग्रणी स्थान पटकावले आहे.

राष्ट्रीय स्तरावर अमरावतीने 18 वे, तर राज्य स्तरावर 17 वे स्थान मिळवले असून, ही कामगिरी शहराच्या स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये वाढलेल्या जाणीवांची आणि प्रशासनाच्या प्रयत्नांची साक्ष आहे.



‘ही कामगिरी म्हणजे फक्त आकड्यांची जादू नाही, तर संपूर्ण शहराने घेतलेली जबाबदारी आणि समर्पणाचे फलित आहे. नागरिक, कर्मचारी व स्वयंसेवी संस्थांचे योगदान मोलाचे ठरले असून, आम्ही पुढे आणखी उंची गाठण्यास तयार आहोत.’

**–शिल्पा नाईक,** अतिरिक्त आयुक्त महापालिका



‘ठाम उद्दिष्ट ठेवून कार्य आरंभ केला. विशेष रणनीती व प्रभावी समन्वय यामुळे हे यश शक्य झाले. हे विजयाचे श्रेय संपूर्ण टीमचे आहे.’ महानगरपालिका आता तीन, पाच वा सात स्टार रँकिंगच्या दिशेने वाटचाल करणार असून, नवकल्पना, शाश्वत उपाययोजना आणि नागरिकांचा सक्रीय सहभाग यांच्या माध्यमातून आगामी काळात शहराची स्वच्छता अधिक प्रभावीपणे उंचावण्याचा निर्धार करत आहोत.

**–श्वेता बोके,** शहर समन्वयक

या यशामागे अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांचे कुशल नेतृत्व, दूरदृष्टी आणि निर्णयक्षमतेचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्वच्छता उपक्रम प्रभावीपणे राबवले गेले. त्याचबरोबर शहर समन्वयक श्वेता बोके यांनी केंद्र सरकारकडे माहिती सादरीकरण, सर्वेक्षण काळातील नियोजन, अंमलबजावणी व प्रत्यक्ष देखरेखीत महत्त्वाची भूमिका बजावली.या अभियानात महानगरपालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांपासून ते सामाजिक संस्थांपर्यंत सर्वांनी योगदान दिले. हे यश म्हणजे अमरावतीकरांच्या एकजुटीचा आणि सामूहिक सहभागाचा परिणाम आहे.

# वरुड तालुका अजुनही दमदार पावसाच्या प्रतिक्षेत

## रिमझिम पावसामुळे कामांचा खोळंबा



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.17 )** – प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर मागील पाच ते सहा दिवसांपासून सर्वदूर वरुणराजाने सतत रिमझिम पावसाची हजेरी लावल्याने बळीराजाला दिलासा मिळाला. तालुक्यात गेल्या आठ दिवसांपासून दिवस-रात्र पाऊस पडत असले तरी नदी, नाले, ओढे मात्र वाहू न लागल्याने सर्व नागरिकांमध्ये भविष्यात पिण्याच्या पाण्याचा विषय चिंतेचा ठरतो आहे. तालुक्यात व परिसरात शेतकऱ्यांनी पावसाची प्रतीक्षा करत मोठ्या हिमतीने साधारण पावसाच्या हजेरीतही पेरण्या केल्या होत्या. काही भागात धूळपेरण्या केल्याने रिमझिम पावसात पिके जमिनीवर आली होती. नंतर जुलै महिन्यात पावसाने 15 ते 20 दिवस दडी मारल्याने कडाक्याच्या गरमीने पिके करपू लागली होती. यात विशेष करून सोयाबीन व कापसाच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत होते. वरूड तालुक्यात यावर्षी पावसाने हजेरी लावलीच नसल्याने मृग नक्षत्रात होणाऱ्या पेरण्या बऱ्याच लांबणीवर पडल्या होत्या. सुरवातीच्या रिमझिम पावसात काही भागात धूळपेरण्या करण्यात आल्या. त्यानंतर बियाणे उगवले असले तरी पावसाने दडी मारल्याने उष्णतेच्या तीव्रतेमुळे उगवलेली पिके करपण्यास सुरुवात झाली.

यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडण्याच्या मार्गावर असताना अचानक वातावरणात बदल झाला आणि ढगाळ वातावरण निर्माण झाले. सतत पाच ते सहा दिवस झालेल्या पावसामुळे पिकांना संजीवनी मिळाली असली तरी नदी, नाले कोरडेच आहेत. त्यामुळे दमदार पावसाची गरज कायम आहे. शेतात चिखल झाल्याने मशागतीचे कामही थांबले आहे. तालुक्यातील नागरिकांना सूर्यदर्शन होत नसल्याने पिकांची वाढही काहीशी खोळंबली आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी आता तरी दमदार पावसाची गरज आहे. या महिन्यात वरुणराजा साथ देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

## सावरखेड-नेरपिंगळाई रस्त्यावर बिबट्याचे दर्शन



**मोर्शी–** मोर्शी तालुक्यातील सावरखेड ते नेरपिंगळाई रस्त्यावर बिबट्या दिसल्याची घटना घडली असून, नेरपिंगळाई येथील सुरज कुरसांगे यांच्या मोटरसायकलसमोर बिबट्या अचानक आल्याचे सांगण्यात येते. या घटनेनंतर परिसरातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने तात्काळ लक्ष घालून बिबट्याच्या हालचालींवर नजर ठेवावी, अशी मागणी होत आहे.

## सहकार क्षेत्रातील योगदानाबाबत पुरस्कार

**अमरावती–** सहकार क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या सहकारी संस्थांना त्यांचे सहकार क्षेत्रातील योगदानाबाबत पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या सहकारी संस्थांनी आपल्या संस्थेचे मुख्यालय असलेल्या संबंधित तालुक्यातील उपनिबंधक, सहायक निबंधक, सहकारी संस्था या कार्यालयांशी संपर्क साधून आपल्या संस्थांचे प्रस्ताव दि. 31 जुलै 2025 पर्यंत सादर करावेत.

# गहाण ठेवलेली दुचाकी परत न करता तरुणाची फसवणूक

## सिटी कोतवालीत गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.17 )**– वडिलांच्या उपचारासाठी पैशांची तातडीने गरज भासल्याने 10 हजार रुपयांना गहाण ठेवलेली दुचाकी परत मागितली असता संबंधित व्यक्तीने टाळाटाळ करत गाडी न देता फसवणूक केली. या प्रकरणी चवरेनगर येथील संतोष वामनराव हातागडे (वय 38) यांनी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून, कठोरा गावातील राम बहाडे (वय 40) याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संतोष हातागडे यांचे वडील आजारी असल्याने उपचारासाठी पैशांची गरज होती. त्यांनी राम बहाडे याच्याकडून 10 हजार रुपये उधार घेतले होते आणि त्याऐवजी आपली दुचाकी (एमएच 27 डीएक्स 3193) गिरवी ठेवली होती. व्यवहार तोंडी झाला होता आणि 10 टक्के व्याजासह परतफेड करण्याचे ठरले होते.

27 जून 2025 रोजी संतोष यांनी राम बहाडे याला पैसे परत देत असल्याचे सांगितले व गाडी परत मागितली. मात्र रामने चिखलदऱ्यात असल्याचे सांगून अरबाज नावाच्या व्यक्तीकडून गाडी घ्यायला सांगितले. संतोष यांनी अरबाजशी संपर्क साधला असता, त्याने दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले. मात्र, नंतर गाडी त्याच्याकडे नसल्याचे सांगून दुर्लक्ष केले. एक महिना उलटूनही गाडी न मिळाल्याने अखेर संतोष हातागडे यांनी पोलिसांकडे धाव घेतली. सिटी कोतवाली पोलिसांनी राम बहाडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# दुचाकीवर विदेशी दारूची तस्करी

## 79 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



**अमरावती** –परराज्यातून आणलेली विदेशी दारू दुचाकीवरून अवैधरित्या विक्रीसाठी नेत असलेला इसम पोलिसांच्या जाळ्यात अडकला. चांदूर रेल्वे पोलिसांनी संताबाई यादवनगर चौकात सापळा रचून संशयितास ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून एकूण 79,660 चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पकडण्यात आलेल्या आरोपीचे नाव विनोद नारायणराव बन्सोड (वय 47, रा. राजुरा, ता. चांदूर रेल्वे) असे असून, तो दुचाकी (क्रमांक क्रमांक एमएच 27 डीआर 4320) वरून दारू घेऊन जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या आधारे पथकाने सापळा रचत त्याला अडवून चौकशी केली. पिशवीत 4,660 किमतीच्या विदेशी दारूच्या बाटल्या आढळून आल्या. यासह वाहतुकीसाठी वापरलेली दुचाकी पोलिसांनी ताब्यात घेतली. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध योग्य कलमान्वये गुन्हा नोंदवून अधिक तपास सुरू केला आहे.

# मयत, निवृत्त कर्मचाऱ्यांना आस्थापनेवर दाखवले

- अंजनगाव सुर्जी नगरपालिकेचा आणखी एक प्रताप उघड
- पालिका कारभारात गंभीर अनियमितता
- त्रयस्थ संस्थेमार्फत चौकशीची मागणी





**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.17 )**– सतत वादग्रस्त आणि अनियमित कारभारामुळे चर्चेत असलेल्या अंजनगाव सुर्जी नगरपालिकेचा आणखी एक धक्कादायक प्रकार माहिती अधिकारातून समोर आला आहे. मयत व निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना आस्थापनेवर दाखवून त्यांचे वेतन दाखवल्याची माहिती पालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून प्राप्त माहिती अधिकारात उजेडात आली आहे. त्यामुळे या कारभारात भ्रष्टाचाराचा गंभीर संशय निर्माण झाला असून, जनतेतून त्रयस्थ संस्थेमार्फत संपूर्ण चौकशीची मागणी करण्यात येत आहे.

दि. 19 जून रोजी माहिती अधिकारात (आरटीआय) विविध माहितीची मागणी करण्यात आली होती. यात नगरपरिषद आकृतीबंध, कार्यरत अधिकारी-कर्मचारी, अंशकालीन व तात्पुरत्या नेमणुकीवरील कर्मचारी, अतीरिक्त प्रभार असलेले अधिकारी, यांच्यासह विविध माहितीचा समावेश होता. मात्र, 16 जुलै रोजी माहिती पुरवताना प्रशासनाने मार्च 2025 मध्ये मृत झालेला कर्मचारी, मार्चमध्येच निवृत्त झालेले अभियंता, तसेच एप्रिलमध्ये बदली झालेल्या अंतर्गत लेखापरीक्षक आणि शिपायाला लिपिक म्हणून दाखवले, अशी धक्कादायक बाब समोर आली. अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे ‘आम्हाला फक्त पगाराशीच देणेघेणे आहे; कर्तव्याशी नाही’ ही मानसिकता स्पष्ट होत असून, नागरिकांना फसवणाऱ्या, निधीचा अपव्यय करणाऱ्या अशा भ्रष्ट व्यवस्थेची चौकशी स्वायत्त व तटस्थ संस्थेमार्फत करण्याची मागणी जोर धरत आहे. या प्रकारामुळे नगरपालिकेच्या विश्वसनीयतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. जर यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी हेतुपुरस्सर माहितीमध्ये फेरफार केला असेल, तर गुन्हेगारी स्वरूपाची कारवाई होणे अपेक्षित आहे. अंजनगाव सुर्जी नगरपालिका प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी आता उच्चस्तरीय हस्तक्षेपाची नितांत आवश्यकता निर्माण झाली आहे. जनतेच्या पैशांचा गैरवापर आणि भ्रष्ट कारभार थांबवण्यासाठी ही चौकशी अत्यावश्यक असल्याचे नागरिकांचे मत आहे.

### वेतन गेले तरी कोठे?

या प्रकरणातून असा प्रश्न उपस्थित होतो की, हे कर्मचारी आजही आस्थापनेवर दाखवले जात असल्याने त्यांचे वेतनही प्रशासनाने काढले का? जर तसे असेल, हे वेतन कुणाच्या खिश्यात गेले. यामागे आर्थिक अपहाराचा गंभीर प्रकार घडला असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे प्रशासनाचा कारभार पारदर्शक नसल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

### पुर्ण माहिती पुढे येणे गरजेचे

नगरविकास विभागाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, नगरपालिका ही नागरी सुविधांचा नीट व्यवस्थापन करणारी स्थानिक संस्था आहे. मात्र, अंजनगाव सुर्जी नगरपालिका या जबाबदारीच्या संपूर्ण विरोधात वागत असल्याचा आरोप नागरिकांकडून होतो आहे. या संपूर्ण प्रकरणाबाबत माहिती अधिकार कार्यकर्ते उमेश काकड यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले, ‘माहिती अधिकारात जनमाहिती अधिकाऱ्याने चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरवली आहे. बरीच माहिती दडपली असून, जर ती पूर्ण माहिती उघड झाली तर आणखी गंभीर बाबी समोर येईल.’

### काय म्हणाले जनमाहिती अधिकारी

या संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया देताना जनमाहिती अधिकारी सुनील उमक म्हणाले की, ‘माहिती मी स्वत: दिली नसून ती लिपिक सोळंके यांनी पुरवली आहे. त्या दिवशी माझी प्रकृती खराब होती. जर माहितीमध्ये काही चुका असतील, तर मी त्या दुरुस्त करून देण्यास तयार आहे. त्यांच्या या विधानामुळे संबंधित माहिती देताना झालेली गडबड कर्तव्यचुकारपणाचे परिणाम की अज्ञानामुळे घडलेली त्रुटी याची चौकशी आवश्यक असल्याचे निदर्शनास येते. तरीही चुकीची माहिती अधिकृतरीत्या देण्यात आली असल्यामुळे, जवाबदारी निश्चित करून पुढील कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# 6 दिवसांपासून बेपत्ता असलेल्या तरुणाचा मृतदेह आढळला!



**महासागर प्रतिनिधी**

**वरूड,( दि.17 )**– वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात असलेल्या किन्ही येथून वरूडला जातो असे सांगून निघालेल्या 39 वर्षीय तरुणाचा मृतदेह वरूड-आष्टी महामार्गावरील वघाळ-गाडेगाव रस्त्यालगत झुडपात सापडल्याने खळबळ उडाली आहे. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आल्यामुळे घातपाताचा संशय व्यक्त केला जात आहे. मृतकाचे नाव राहुल अशोक तायडे (वय 39, रा. किन्ही, ह. मु. नवीन आष्टी, जि. वर्धा) असे असून तो 11 जुलै रोजी दोन मित्रांसह वरूडला जातो असे सांगून एमएच 32/ एएम 1854 क्रमांकाच्या दुचाकीवर निघाला होता. मात्र त्यानंतर तो घरी परतलाच नाही. कुटुंबीयांनी शोधाशोध केल्यानंतरही काही तपास लागला नाही, त्यामुळे आष्टी पोलिस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती.16 जुलै रोजी दुपारी 1 वाजता नागरिकांना वघाळ-गाडेगाव मार्गावरील झुडपात कुजलेला मृतदेह दिसून आला. याबाबत पोलिसांना माहिती देण्यात आली. बेनोडा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून ओळख पटवली. ही घटना घातपातामुळे घडली असावी, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणात पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनात एसडीपीओ संतोष खांडेकर, ठाणेदार विवेक देशमुख, पीएसआय राजेंद्र काळे आणि पोलीस पथक तपास करत आहे. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. मृत्यूचे नेमके कारण पोस्टमार्टेम अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.

### घातपाताचा संशय


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# डॉ. झीशान अली यांनी वनस्पती आधारित आहाराच्या माध्यमातून उत्तम आरोग्यासाठीच्या भूमिकेवर टाकला प्रकाश

**अमरावती, १७ जुलै :** भारतासह महाराष्ट्रातही जीवनशैलीशी संबंधित आजार झपाट्याने वाढत आहेत. अशा पार्श्वभूमीवर अमरावतीतील भावी डॉक्टरांना औषधांच्या पुढे पाहत, आजारांची मुळे शोधण्यासाठी पोषण या मार्गाकडे वळण्याचा सल्ला दिला जात आहे.

महाराष्ट्रातील वाढता आजारभार नवीनतम राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार (एनएफएचएस-५), महाराष्ट्रातील १२.४% महिलांना आणि १३.६% पुरुषांना मधुमेह आहे. उच्च रक्तदाबाने २३.१% महिला आणि २४.४% पुरुष प्रभावित आहेत. तर कंबर-नितंब गुणोत्तर (वेस्ट-हिप रेशो) वाढलेले जो चयापचयाशी संबंधित धोक्याचा महत्त्वाचा संकेत आहे असे ४४.५% महिलांमध्ये आणि ४०.७% पुरुषांमध्ये आढळले. हे आकडे राष्ट्रीय पातळीवरील प्रवृत्तीशी सुसंगत असून प्रतिबंधात्मक उपायांची निकड अधोरेखित करतात.

अलीकडेच डॉ. पंजाबराव ऊर्फ भाऊसाहेब देशमुख वैद्यकीय महाविद्यालय (पीडीएमएमसी), अमरावती येथे झालेल्या एका विशेष सत्रात वैद्यकीय विद्यार्थी, संशोधन सहकारी आणि प्राध्यापकांनी आहाराच्या सवयी आरोग्य परिणामांवर कशा प्रकारे प्रभाव टाकतात यावर चर्चा केली. हे सत्र फिजिशियन कमिटी फॉर रिस्पॉन्सिबल मेडिसिन (पीसीआरएम) चे संशोधन कार्यक्रम तज्ज्ञ डॉ. झीशान अली यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

डॉ. झीशान अली यांनी सहभागी विद्यार्थ्यांना हे जाणून घेण्याचे आवाहन केले की, पोषण म्हणजे केवळ आहार नव्हे, तर दीर्घकालीन आरोग्य आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या आजारांचा धोका कमी करण्यासाठी एक प्रभावी उपाय आहे. वैज्ञानिक संशोधन स्पष्टपणे दाखवते की, कमी मेदयुक्त आणि वनस्पती-आधारित आहार केवळ लक्षणे नियंत्रणात ठेवत नाही, तर औषधांची गरज कमी करू शकतो, कोलेस्टेरॉलची पातळी खाली आणू शकतो आणि टाईप २ मधुमेह व सुरुवातीच्या टप्प्यातील धमन्यांतील अडथळा देखील मागे फिरवू शकतो, असे डॉ. अली यांनी सांगितले. जेव्हा आपण संपूर्ण, फायबरयुक्त अन्नपदार्थ जसे की कडधान्ये, फळे, भाज्या आणि संपूर्ण धान्य यांच्याकडे वळतो, तेव्हा आपण शरीराच्या नैसर्गिक बरे होण्याच्या क्षमतेला पाठिंबा देतो.

डॉ. अली यांनी क्लिनिकल पुरावे सादर केले, जे दर्शवतात की वनस्पती-आधारित आहारामुळे चयापचयाशी संबंधित आरोग्य सुधारू शकते. त्यांनी एका अभ्यासाचा उल्लेख केला, ज्यामध्ये टाईप १ मधुमेह असलेल्या रुग्णांनी कमी मेदयुक्त वनस्पती-आधारित आहार अवलंबल्यावर १२७% इतकी इन्सुलिन सेंसिटिव्हिटीमध्ये सुधारणा अनुभवली तेही कॅलोरी किंवा कार्बोहायड्रेट मर्यादित न करता.

त्याचप्रमाणे, टाईप २ मधुमेहावर झालेल्या संशोधनात असे दिसून आले की संपूर्ण अन्नावर आधारित वनस्पतीजन्य आहार रक्तातील साखरेचे नियंत्रण, वजन व्यवस्थापन आणि दीर्घकालीन आरोग्यासाठी अधिक परिणामकारक ठरतो.

या सत्रात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. आरोग्य सेवेमधील पोषणाच्या भूमिकेवर त्यांनी अर्थपूर्ण चर्चा केली. रुग्णांना मार्गदर्शन करण्याचे व्यावहारिक मार्ग, आहारविषयक सल्ला देणे, तसेच आपल्या समाजामध्ये आरोग्यदायी खाण्याच्या सवयी कशा वाढवता येतील यावर विद्यार्थ्यांनी विचारपूर्ण प्रश्न उपस्थित केले.

हा कार्यक्रम फिजिशियन कमिटी फॉर रिस्पॉन्सिबल मेडिसिन या संस्थेच्या भारतभर वैद्यकीय विद्यार्थी, आरोग्यसेवा व्यावसायिक आणि स्थानिक समुदायांमध्ये पोषणविषयक साक्षरता वाढवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग होता. उद्देश एकच देशात वाढत चाललेल्या अपसर्जनशील आजारांचा भार कमी करणे.

फिजिशियन कमिटीविषयी

फिजिशियन कमिटी फॉर रिस्पॉन्सिबल मेडिसिन ही संस्था १९८५ मध्ये स्थापन झाली असून ही एक ना-नफा संस्था आहे. ती प्रतिबंधात्मक वैद्यकशास्त्राचा प्रचार करते, नैदानिक संशोधन करते आणि शिक्षण व संशोधनामध्ये नैतिकता आणि परिणामकारकतेसाठी उच्च दर्जाचे निकष पाळण्यास प्रोत्साहित करते.

# फूडलिंक एफअँडबी होल्डिंग्सने आयपीओसाठी सेबीकडे दाखल केली ड्राफ्ट कागदपत्रे

**नागपूर, १७ जुलै :** फूडलिंक एफअँडबी होल्डिंग्स (इंडिया), ही केटरिंग आणि फूड रिटेल चेन कंपनी असून, कंपनीने आयपीओच्या माध्यमातून निधी उभारण्यासाठी भांडवली बाजार नियामक सेबीकडे कागदपत्रे दाखल केली आहेत.

ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस नुसार, हा आयपीओ नवीन इक्विटी शेअर्सच्या छ१६० कोटी पर्यंतच्या इश्यूचा आणि प्रमोटर्स व गुंतवणूकदार विक्रीदारांकडून एकूण १.१९ कोटींहून अधिक शेअर्सच्या ऑफर फॉर सेलचे (ओएफएस) मिश्रण आहे.

ओएफएसचा भाग म्हणून, प्रमोटर्स अंकिता चुग, ट्रान्स ग्लोबल होटेल्स एलएलपी आणि संजय मनोहर वाझीरणी कंपनीतील आपले हिस्से विकणार आहेत.

अर्पित खंडेलवाल, व्हीओशियन इन्व्हेस्टमेंट्स, ओक्स अॅसेट मॅनेजमेंट, आर्कांय इन्व्हेस्टमेंट्स, वेलस्पुन ग्रुप मास्टर ट्रस्ट (ट्रस्टी बालक्रिष्णा गोएंकामार्फत), आरिन कॅपिटल पार्टनर्स (टी. व्ही. मोहंदास पई आणि रंजन रामदास पई यांच्या माध्यमातून) आणि बोने टेरा ग्रीन हाऊस एलएलपी हे इतर गुंतवणूकदार आहेत जे कंपनीतील आपले हिस्सा विकणार आहेत.

याशिवाय, कंपनी प्री-ओयपीओ प्लेसमेंट राउंडही घेऊ शकते ज्याद्वारे सुमारे ३२ कोटींची उभारणी करण्याचा विचार आहे. अशा प्रकारची प्लेसमेंट झाल्यास नवीन इक्विटी इश्यूचा आकार कमी होऊ शकतो.

ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस नुसार, कंपनी नवीन इक्विटी इश्यूमधून मिळणाऱ्या निधीचा वापर दोन नवीन सेंट्रलाइज्ड किचन उभारणीसाठी आणि आपल्या महत्वाच्या उपकंपनी पूडलिंक ग्लोबल रेस्टॉरंट्स अँड केटरिंग सर्व्हिसेसमध्ये चार नवीन कॅज्युअल डायनिंग रेस्टॉरंट्स उभारण्यासाठी गुंतवणुकीसाठी करणार आहे.

निधीचा वापर कर्जफेडीसाठी आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी देखील केला जाणार आहे. मुंबईस्थित फूडलिंक एफअँडबी होल्डिंग्स (इंडिया) ही एक जागतिक लक्झरी फूड सर्व्हिसेस व्यवसाय आहे जी खास निवडक पाककला अनुभव प्रदान करण्यात लक्ष केंद्रित करते.

कंपनीचा व्यवसाय मॉडेल इव्हेंट्स केटरिंग, कॅज्युअल डायनिंग रेस्टॉरंट्स आणि क्लाउड किचन्स, तसेच बॅन्क्वेट्स आणि इंटीग्रेटेड एफअँडबी सेवा यांचा समावेश करतो.

इव्हेंट्स केटरिंग व्यवसायात कंपनीचे क्लायंट हार्डकॅसल रेस्टॉरंट (पश्चिम आणि दक्षिण भारतातील मॅकडोनाल्ड्सचा मास्टर फ्रँचायझी ऑपरेटर), झी एंटरटेनमेंट आणि ग्रीनप्लाय यांचा समावेश आहे.

कंपनी भारत आणि युनायटेड अरब अमीरात येथे आपल्या प्रमुख ब्रँड्स इंडिया बिस्त्रो, आर्ट ऑफ डम, चायना बिस्त्रो आणि ग्लोकल मार्फत कॅज्युअल डायनिंग रेस्टॉरंट्स आणि क्लाउड किचन्स चालवते.

कंपनीच्या शेअर्सची यादी बीएसई आणि एनएसई या स्टॉक एक्सचेंजवर केली जाण्याचा प्रस्ताव आहे.

इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स म्हणून इक्विरस कॅपिटल आणि जेएम फायनान्शियल कार्यरत आहेत, तर सार्वजनिक विक्रीसाठी एमयूएफजी इनटाईम इंडिया ही नोंदणी संस्था (रजिस्ट्रार) आहे.

# शुभांगी अत्रे म्हणाल्या, 'मेघा धाडे माझ्या संघर्षमय दिवसांमध्ये माझ्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली'



**मुंबई, १७ जुलै :** एण्ड टीव्हीवरील मालिका 'भाबीजी घर पर है'मध्ये अंगूरी भाबीच्या भूमिकेसाठी सर्वत्र लोकप्रिय झालेल्या शुभांगी अत्रे यांच्यासाठी स्टारडमचा मार्ग नेहमीच हास्य आणि कौतुकाचा नव्हरता. एक काळ असा होता जेव्हा स्वप्ननगरीने त्यांच्या् सहनशक्तीची परीक्षा घेतली, क्षणभर त्यां ना राहण्यासाठी घर देखील नव्हते. पण प्रत्येक शक्तिशाली कथेप्रमाणे करुणा, बहिणभाव आणि अनपेक्षित दयाळूपणासह त्यांच्या जीवनाला हृदयस्पर्शी वळण मिळाले. संघर्षाच्या त्या सुरुवातीच्या दिवसांना उजाळा देत शुभांगी अत्रे ऊर्फ अंगूरी भाबी म्हणाल्या, ''असे वाटते तो क्षण कालच घडला आहे. मी पुण्यामध्ये माझ्या दहा महिन्यांच्या बाळाला मागे सोडून स्वप्ननगरी मुंबईत आले होते. तो मी जीवनात घेतलेला सर्वात कठीण निर्णय होता. एका महिन्यामध्ये मी एका मालिकेमध्ये काम करू लागले आणि प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू झाल्या.चे वाटत होते. पण नशीबात काही वेगळेच लिहिलेले होते. मी इतर काही मुलींसोबत पीजीमध्ये एकत्र राहत हाते आणि एकेदिवशी अधिक वेळ शूटिंग केल्यानंतर मी घरी परतले आणि मला मोठ्या संकटाचा सामना करावा लागला. घरमालकाने अचानक आम्हा सर्वांना घर खाली करण्यास सांगितले. हे ऐकताच आम्हाहला धक्का बसला. मी शहरामध्ये नवीन होते, माझ्या बाळाची आठवण येत होती आणि आता राहण्यासाठी घर नव्हते. मी त्यावेळी मुंबईत कोणालाही ओळखत नव्हरते. मी खूप दु:खी होते आणि पुण्याला परतण्याचा व माझ्या अभिनयाच्या स्वप्नाला सोडून देण्याचा विचार केला. पण सगळं काही बिघडत चाललंय असं वाटत असताना एक मैत्रिण जीवनात नवीन आशेचा किरण घेऊन आली.'' त्या पुढे म्हेणाल्या, ''त्या घाबरलेल्या आणि असहाय्यतेच्या क्षणी मी फक्त माझी जिवलग मैत्रिण आणि अभिनेत्री मेघा धाडेचा विचार करू शकत होते, जिला मी शूटिंग दरम्यान भेटले होते. मी तिला फोन केला आणि सर्व काही समजावून सांगितले. अजिबात संकोच न करता ती म्हणाली, 'तू जिथे आहेस तिथेच थांब. मी तुला घ्यायला येत आहे.' दिलेल्या शब्दाप्रमाणे तिने मला पिक अप केले आणि घरी नेले. तिने मला आश्रय दिला, आधार दिला आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आशा दिली. मी तो क्षण कधीही विसरणार नाही.''

जीवनाला कलाटणी देणाऱ्या त्याल क्षणाला उजाळा देत त्या् पुढे म्हणाल्या, ''प्रत्येकाला अशी एक व्यक्ती हवी असते, जी जग तुमच्या विरोधात असतानाही मदतीसाठी धावून येते. माझ्यासाठी, मेघा ती व्यक्तीत होती. तिने मला राहण्यासाठी जागा देण्यातसोबत संघर्षमय दिवसांमध्ये माझ्यामध्ये आशेचा किरण देखील जागृत केला. आपण अनेकदा यश साजरे करतो, पण आयुष्यातील आव्हानात्मक क्षण आपल्याल जीवनाला आकार देतात. मुंबईने माझी अनेक प्रकारे परीक्षा घेतली, पण मला मेघासारखे देवदूत देखील दिले. आजही, ती फोन करते तेव्हा मी तिच्यासाठी सर्वकाही सोडून वेळ देते. आमचे हे नाते मैत्रीच्या पलीकडे आहे, आम्ही बहिणींसारखे आहोत, ज्यांनी आयुष्यातील वादळांना एकत्र तोंड दिले आहे.''

# एअरटेल ने पर्प्लेक्सीटी सोबत भागीदारी केली

**नवी दिल्ली, १७ जुलै :** भारती एअरटेल आणि पर्प्लेक्सीटी यांनी भागीदारी केली आहे जेणेकरून आपल्या सर्व ३६० मिलियन ग्राहकांना १२ महिन्यांचे पर्प्लेक्सीटी प्रो सब्सक्रिप्शन मोफत देता येईल.




पर्प्लेक्सीटी हे एआय-संचालित शोध करता येणारे आणि उत्तर देणारे इंजिन आहे जे वापरकर्त्यांना एका संभाषणात्मक भाषेत वास्तविक काळातील, अचूक आणि सखोल संशोधन केलेले प्रतिसाद प्रदान करते. वेब पृष्ठांचे लिस्टिंग ते वाचण्यास सुलभ उत्तरापर्यंत, हे ग्राहकांच्या शोधचा स्तर उंचावते. स्वयं शिकता येणारे एआय-टूल वापरुन हे पुनःपुन्हा केले जाऊ शकते जेणेकरून वापरकर्त्यास आवश्यक असलेले अचूक परिणाम मिळू शकतील.

पर्प्लेक्सीटी शक्तिशाली शोध कार्ये प्रदान करणारे एक मोफत ऑफर देऊ करत आहे, तर प्रो आवृत्ती व्यावसायिक आणि भरपूर वापर करणाऱ्या वापरकर्त्यांसाठी वाढीव क्षमता प्रदान करत आहे. पर्प्लेक्सिटी प्रो मध्ये प्रत्येक वापरकर्त्यामागे अधिक दैनंदिन प्रो शोध, प्रगत एआय मॉडेल्समध्ये प्रवेश (उदाहरणार्थ, जीपीटी ४.१, क्लॉड) आणि विशिष्ट मॉडेल्स निवडण्याची क्षमता, सखोल संशोधन, प्रतिमा निर्मिती, फाइल अपलोड आणि विश्लेषण, तसेच कल्पनांना जिवंत स्वरूप देणारे एक अद्वितीय साधन म्हणजे पर्प्लेक्सिटी लॅब्स सामील आहे. जगभरात एका वर्षासाठी प्रो ची किंमत *रु. १७००० असणार आहे.

या भागीदारीबाबत टिप्पणी करताना गोपाल विठ्ठल, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, भारती एअरटेल म्हणाले की, आम्ही आनंदाने पर्प्लेक्सीटी बरोबर एक खेळ बदळणारी भागीदारी जाहीर करत आहोत आणि त्यायोगे एयरटेल ग्राहकांसाठी त्यांच्या अत्याधुनिक एआय क्षमता प्रदान करत आहोत. लाखो वापरकर्त्यांना शक्तिशाली आणि वास्तविक काळातील ज्ञानाचे साधन, या सहयोगामुळे चुटकीसरशी उपलब्ध करून दिले जाणार आहे आणि त्यासाठी कोणताही अतिरिक्त खर्च करावा लागणार नाही. भारतातील या पहिल्या प्रकारच्या जेन-एआय भागीदारीने, आपल्या ग्राहकांना डिजिटल जगातील उदयोन्मुख कल आत्मविश्वासाने आणि सहजतेने पार करण्यास मदत करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

अरविंद श्रीनिवास सहसंस्थापक, सीईओ पर्प्लेक्सीटी म्हणाले, ही भागीदारी भारतातील अधिक लोकांसाठी अचूक, विश्वासार्ह आणि व्यावसायिक दर्जाच्या एआय मध्ये प्रवेश करण्याचा एक रोमांचक मार्ग आहे - मग ते विद्यार्थी असोत, काम करणारा व्यावसायिक असोत किंवा घर चालविणे असो. पर्प्लेक्सीटी प्रो वापरून वापरकर्त्यांना माहिती शोधण्याचा, शिकण्याचा आणि अधिक गोष्टी करण्याचा एक स्मार्ट, सोपा मार्ग उपलब्ध होत आहे.

या खेळ बदलणाऱ्या भागीदारीच्या शक्तीचे उदाहरण देता यावे म्हणून राजकोटमधील एका विद्यार्थ्याचे उदाहरण घेऊया. पर्प्लेक्सिटी प्रो वेबवरील वैध संशोधनाची प्रक्रिया, शिक्षण आणि सहयोगाची प्रक्रिया प्रदान करू शकते आणि तर्कशुद्ध व समजण्यास सोप्या पद्धतीने सामग्रीचे आयोजन करण्यात मदत करू शकते. त्यायोगे विद्यार्थ्याला शैक्षणिक उत्कृष्टतेचे मानक टिकवून ठेवण्यात मदत करते. कन्याकुमारीमध्ये राहणाऱ्या गृहिणीसाठी, पर्प्लेक्सीटी सहाय्यक म्हणून काम करून दैनंदिन कामांसाठी जलद व नेमके प्रतिसाद देते, कल्पकतेसाठी आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्याकरिता प्रोत्साहन देते: हे सर्व एका वापरकर्ता अनुकूल इंटरफेस द्वारे करते. नवीन स्थळी कुटुंबाला सहलीला घेऊन जाण्याची इच्छा असलेल्या पण कामात व्यस्त असलेल्या एका व्यावसायिकासाठी, पर्प्लेक्सीटी प्रो वापरकर्त्याने दिलेली वेळ, निश्चित बजेट्स आणि अनिवार्य उपक्रम यांच्यावर अवलंबून राहून काही सेकंदातच प्रवासाची योजना तयार करू शकते. वापरकर्त्यांसाठी उत्पादक क्षमता वाढणे, आणि ताण कमी होणे असा लाभ आहे जो एखाद्याला टूल वापरल्यानंतरच समजू शकतो.

# मिका सिंग आणि रणविजय सिंघा यांनी 'छोरियां चली गाँव'च्या नव्या म्युझिक व्हिडिओमध्ये आणली ऊर्जा!

**मुंबई, १७ जुलै :** झी टीव्ही घेऊन येत आहे 'छोरियां चली गाँव' एक दमदार नवीन नॉन-फिक्शन शो, ज्यामध्ये ११ शहरी महिला शहरातील सोयीसुविधा मागे ठेवून ग्रामीण भारतातील एका खेड्यात जगण्यासाठी, जुळवून घेण्यासाठी आणि तग धरून टिकण्यासाठी सज्ज होतील. देसी स्टाइल आणि भावनिक ताकदीचे अनोखे मिश्रण असलेला हा शो, भारत आणि इंडिया या दोन जगांमधला दुवा बनतो.

या शोच्या जोशात भर टाकतो त्याचा धडाकेबाज टायटल ट्रॅक जो पहिल्याच बीटपासून ऊर्जा निर्माण करतो. या ट्रॅकला आवाज दिला आहे म्युझिक पॉवरहाऊस मिका सिंगने, आणि यात तो स्वतः आणि शोचा होस्ट रणविजय सिंघा दोघेही झळकतात. भरत आणि हरिदत्त यांनी संगीतबद्ध केलेले हे गाणे शोची ग्रामीण उर्जा आणि बंडखोर टोन अगदी अचूक पकडते आणि एक विनोदी, खोडकर इशारा देते की स्पर्धकांना पुढे काय काय सहन करावे लागणार आहे! या गाण्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे मिका आणि रणविजय यांचे पुन्हा एकत्र येणे तब्बल दोन दशकांनंतर एकत्र काम करताना या जिवलग मित्रांची केमिस्ट्री गाण्यात ठळकपणे दिसून येते. एका उजळ गावात चित्रीत केलेला हा म्युझिक व्हिडिओ शोला जबरदस्त पंच, व्यक्तिमत्त्व आणि प्रीमियरपूर्वीच तुफान चर्चा मिळवून देतो.

या ट्रॅकबद्दलचा आपला उत्साह शेअर करत मिका सिंग म्हणाला, मी गेल्या अनेक वर्षांत झी टीव्हीवरील विविध रिअॅलिटी शोजचा भाग राहिलो आहे, आणि प्रत्येक वेळेस त्यांच्यासोबतचे काम म्हणजे घरचेच वातावरण वाटते. त्यांच्या संकल्पनांमध्ये एक खास उर्जा, एक ठेका असतो जो मला एक कलाकार म्हणून नेहमीच आकर्षित करतो. 'छोरियां चली गाँव'च्या टायटल ट्रॅकसाठी जेव्हा मी पहिल्यांदा ऐकले, तेव्हाच जाणवले की यात काहीतरी विशेष होण्याची ताकद आहे. याची लय जबरदस्त आहे ती कच्ची, देसी उर्जा अगदी माझ्या गाण्याच्या स्टाईलला साजेशी आहे. हे असे गाणे आहे, जे ऐकताना तुमचे पाय आपोआप ठेका धरू लागतात, आणि प्रत्येक बीट तुम्हाला जाणवतो.

रणविजय सिंघा म्हणाला, मी जेव्हा २००३ साली दिल्लीमध्ये सर्वप्रथम मिकापाजींना भेटलो तेव्हासुद्धा त्यांची ऊर्जा आणि शैली अगदी आकर्षक होती. छोरीयां चली गाँवच्या टायटल ट्रॅकसाठी त्यांच्यासोबत सहकार्य करताना अगदी धमाल येत आहे. आपल्या प्रत्येक गाण्यासोबत ते एक जादू आणतात आणि त्यांच्यासोबत इतक्या वर्षांनंतर काम करायला मिळणे हे खरंच खास आहे.

तो पुढे म्हणाला, हा अगदी कॅची ट्रॅक आहे. ह्या गाण्याबद्दल मला सगळ्यात जास्त हे आवडलं की ते



ह्या शो चा सार अतिशय छान पद्धतीने टिपते. आवाज, मूड आणि ॲटिट्यूड सगळं काही छोरीयां चली गाँवसोबत जोडलेले आहे. मला खरंच वाटतं की संगीत ह्या शो चा एक सिग्नेचर एलिमेंट असेल. आतासुद्धा ती चाल माझ्या मनात वाजते आहे. ती एवढी ॲतडिक्टिव्ह आहे. मला आशा आहे की प्रेक्षकांनाही ती आवडेल.

बोल्ड संकल्पना, बळकट व्यक्तिरेखा आणि अफलातून टायटल गीत यांसह छोरीयां चली गाँव हा नक्कीच मोठा प्रभाव पाडेल. ग्रामीण आयुष्य, खडतर आव्हाने आणि आपल्या आतील शक्ती यांसह ह्या शोमधील तरूण स्पर्धक आपल्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडतील, त्यांच्यावर प्रकाशाचा झोत आणण्याचा ह्या शो चा उद्देश्य आहे.

# सोनी सबवरील वागळे की दुनिया मालिकेत सखी आणि विवानच्या साखरपुड्यामुळे नवा ट्विस्ट

**मुंबई, १७ जुलै :** सोनी सबवरील वागळे की दुनिया-नयी पिढी नये किस्से या मालिकेत एका मध्यमवर्गीय भारतीय कुटुंबासमोरील दैनंदिन अडचणी आणि आनंदाचे चित्रण करण्यात आले आहे. यात भावनिक प्रसंग आणि विनोद यांचा मिलाप पहायला मिळतो. राधिका (भारती आचरेकर) हिच्या स्मृतीभ्रंशापासून ते सखी (चिन्मयी साळवी) हिचे विवान (नमित शाह) यांचे फुलणारे नाते यांसारख्या भावनिक आव्हानांमधून वागळे कुटुंब सावरत असतानाच.. राजेश (सुमित राघवन) हा स्वत:ला एक संरक्षक पिता आणि आधुनिक पिता या दोहोंमध्ये विभागलेला पाहतो.

आगामी भागांमध्ये राजेश एक अनपेक्षित पाऊल पुढे टाकतो. तो सखी आणि विवानच्या साखरपुड्यासाठी तयार होतो. पण त्यासाठी काही अटी घालतो. २१ दिवसांच्या नो कॉंटॅक्ट चॅलेंजमधून त्यांच्या वचनबद्धतेची परीक्षा पाहिल्यानंतर आणि कौटुंबिक संकटात विवानने दाखवलेल्या सतर्कतेमुळे, राजेश थोडा नरमतो. पण राजेश जसा या दोघांचे नाते स्वीकारायला जातो, तशी नवीनच कसोटी त्याची वाट पाहत असते. राजेश विवानच्या पालकांना भेटतो. दोन्ही कुटुंब पहिल्यांदाच भेटतात, तेव्हा त्यांना काही सांस्कृतिक फरक, भिन्न सामाजिक पार्श्वभूमी, भिन्न अपेक्षा निदर्शनास येतात. मध्यमवर्गीय मूल्यांमध्ये खोलवर रुजलेला राजेश विचार करतो की, खरोखरच हे नव्याने जुळणारे नाते योग्य आहे की नाही?

राजेश अजूनही आपल्या मुलीच्या निवडीवर ठाम राहील का? की त्याने स्वीकारलेल्या प्रत्येक गोष्टीला या भेटीमुळे वेगळे वळण मिळेल?

राजेशची भूमिका साकारणारे सुमित राघवन सांगतात, अनेक पालकांना अनुभवावा लागणारा हा एक वास्तविक संघर्ष आहे. आपल्या मुलांचे संरक्षण करण्याची भूमिका ते त्यांच्या निवडीवर विश्वास ठेवण्यापर्यंतचा हा बदल आहे. राजेश प्रेमाच्या विरोधात नाही, पण त्याला फक्त सखीसोबतचे त्याचे जवळीकतेचे नाते गमावण्याची भीती आहे. साखरपुड्याला होकार देणे हे त्याच्यासाठी एक मोठे पाऊल आहे. पण विवानच्या पालकांची भेट घेतल्यावर त्याच्या मनात नवीन शंका आणि विचार येऊ लागतात. पित्याच्या भूमिकेतील स्वीकार, अहंकार आणि जुळवून घेण्याची क्षमता.. यांची अत्यंत शांत पण कठीण अशी ही परीक्षा आहे.

## आज का अंदाज

शुक्रवार १८ जुलै २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | २ | ५ | ६ | ७ |
| २५५ | ३५५ | ४४८ | ५७७ | १४७ | २५८ | १५० | २६९ |
| ५७० | ५९९ | ६०० | २७० | ३९० | ७८० | २६८ | ४५८ |
| ३९० | ४९० | ८८० | ३६० | २०० | ३५७ | ३६७ | ३७७ |
| २४ | ३४ | ६८ | ९८ | २४ | ५४ | ६१ | ७१ |
| २० | ३० | ६७ | ९७ | २८ | ५८ | ६९ | ७९ |
| २१ | ३१ | ६५ | ९५ | २० | ५० | ६४ | ७४ |

**१८ जुलै : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ४० | ७३ | ८३ |
| १६ | ४६ | ७५ | ८५ |
| १२ | ४२ | ७९ | ८९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# कोणीतरी प्रेमात पडेल, तर कोणालातरी आजारी असल्यासारखे वाटेल

**मुंबई, १७जुलै :** एण्ड टीव्हीवरील मालिका हप्पू की उलटन पलटन' आणि भाबीजी घर पर है'मध्ये पात्र अद्भुत स्थितींमध्ये अडकणार आहेत. मालिका हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडबाबत दरोगा हप्पू सिंग ऊर्फ योगेश त्रिपाठी म्हणाले, राजेश (गीतांजली मिश्रा) आणि हप्पू त्यांची मुलगी मलायकाच्यां (सोनल पवार) भविष्याबाबत खूप चिंतेत आहेत. ते तिला तिच्यासाठी योग्य जोडीदार शोधण्याचे सांगतात किंवा त्यांना तिच्यांसाठी जोडीदार शोधण्याची परवानगी द्यावी. पोलिस स्टेशनमध्ये जात असताना मलायका एका गरजू तरूणाला मदत करते. तो तरूण मुलगा त्वरित तिच्यावर मोहित होतो आणि मलायकाला देखील तो योग्य वाटतो. ते गप्पागोष्टी करू लागतात आणि त्यांच्या मध्ये नाते वाढत जाते. शेवटी, विवाह करण्यायचा दबाव वाढत असताना मलायका कुटुंबाला त्याच्याबाबत सांगण्याणचे ठरवते. मुलाचे कुटुंब तिच्या घरी भेट द्यायला येतात आणि सर्वजण प्रभावित होतात. पण त्यानंतर अनपेक्षित ट्विस्ट येते, मुलाचे वडिल विवाहाला मंजूरी देण्यापूर्वी तीन विलक्षण अटी सांगतात. पहिली अट म्हणजे हप्पूला दोरीवरून चालावे लागेल. दुसरी, स्मशानात एकटं रात्र घालवावी लागेल. आणि तिसरी, सर्वांसाठी चहा बनवावा लागेल. त्याच्या नेहमीच्या जुगाडू शैलीने हप्पू कसातरी पहिल्या दोन अटी पूर्ण करण्यात यशस्वी होतो. पण तो तिसरी अट पूर्ण करणार असताना चहा बनवताना त्याचा शॉर्टकट उघड होतो! मुलाचे वडील त्याला रंगेहाथ पकडतात आणि प्रामाणिकपणा व मूल्यांवर खडसावून समजावू लागतात, ज्यामुळे मलायका खूप नाराज होते. तिला वाटते की तिच्यामुळे हप्पूला आव्हानात्माक प्रसंगाचा सामना करावा लागतो, भावूक होत ती विवाह मोडण्याचा निर्णय घेते.

## राशीभविष्य

**मेष :** महत्त्वाच्या बाबींमध्ये काळजीपूर्वक विचार करून निर्णय घ्या. तुमच्या आईमुळे तुम्हाला वाईट वाटू शकते. राजकारणात अपेक्षित पाठिंबा मिळणार नाही हुशारी आणि कौशल्यामुळे परिस्थिती सुधारेल.

**धनु :** आज महत्त्वाच्या कामांमध्ये संघर्ष वाढू शकतो. सामाजिक कार्यात संयमाने वागा. विरोधक तुमचा अपमान करण्याचा प्रयत्न करू शकतात. याबाबतीत सावधगिरी बाळगा.

**वृषभ :** आज कामाच्या ठिकाणी अनावश्यक धावपळ होईल. तुम्हाला नको असलेल्या प्रवासाला, बाहेर जावे लागू शकते. व्यवसायात अपेक्षित उत्पन्न नसल्याने तणाव आणि चिंता असेल.

**मिथुन :** आज आर्थिक स्थितीत मोठे चढ-उतार येतील. संपत्ती आणि मालमत्तेच्या समस्या समाजात बदनामीचा धडा बनतील. कौटुंबिक जीवनात विचार न करता पैसे खर्च करण्याच्या सवयीमुळे वाद होऊ शकतात.

**कर्क :** आजचा दिवस थोडा दगदगीचा असू शकतो. तुमच्या मेहनतीसाठी तुम्हाला एखादे आर्थिक बक्षिसे लवकरच मिळेल. कुटुंबासाठी गेट टु गेदरचे प्लॅनिंग कराल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे.

**सिंह :** एखाद्या महत्त्वाच्या कामाची जबाबदारी मिळाल्याने समाजात तुमचा सन्मान आणि प्रतिष्ठा वाढेल. तुमच्या कामाच्या ठिकाणी नोकरदारांचा आनंद वाढेल. आर्थिक लाभ होईल.

**कन्या :** तुम्हाला शेतीचे काम करण्यासाठी एखाद्याच्या प्रभावाखाली आणले जाऊ शकते. तुम्ही बँकेतून तुमची बचत काढून घ्याल आणि चैनीच्या वस्तूंवर पैसे खर्च कराल. कामाच्या ठिकाणी सकारात्मक बदल दिसेल.

**तुळ :** आज तुम्ही तुमच्या शत्रूंवर विजय मिळवाल. व्यवसायातील परिस्थिती सुधारेल. राजकीय विरोधकांचा पराभव होईल. तुमच्या नोकरीत वरिष्ठ अधिकाजयाच्या जवळीकतेचा तुम्हाला फायदा होईल.


**वृश्चिक :** मानसिक ताणतणावापासून वाचण्यासाठी संयम आणि शांतता महत्त्वाची आहे. नोकरी करणाजयांचे अधिकार वाढतील, पण त्यामुळे आजूबाजूच्या कर्मचाजयांसोबत कटू संबंध निर्माण होतील.

**मकर :** कोणत्याही महत्त्वाच्या कामाची जबाबदारी दुसजयावर देण्याऐवजी ते काम स्वत: करा. व्यवसायात, भावनांपेक्षा तुमच्या बुद्धिमत्तेला आणि विवेकाला जास्त महत्त्व द्या. नफ्याची शक्यता जास्त असेल.

**कुंभ :** महत्त्वाचं काम पूर्ण करण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागू शकतो. सामाजिक कार्य करताना वागण्यात संयम ठेवा. विरोधक तुम्हाला खाली खेचण्याचा प्रयत्न करू शकतात. या बाबतीत सावधगिरी बाळगा.

**मीन :** आजचा दिवस तुमच्यासाठी नफा आणि प्रगतीचा असेल. महत्त्वाच्या कामात यश मिळण्याचे संकेत मिळतील. तुम्ही नवीन काम सुरू करू शकता. नातेवाईक आणि मित्रांकडून सहकार्य मिळेल.

## शब्दकोडे क्रमांक २१६८



**आडवे शब्द :-**
१) प्रसूतीसमय
५) प्रचंड, मोठा
७) धैर्य, हिंमत
९) मानेवरील सूज, चिकणमाती
१०) धमकी
१२) चटकन, जलदीने
१४) विमान
१५) पैंजण
१६) बैलाचा सण
१८) आकाश
१९) शपथ
२०) कायद्याप्रमाणे
२२) मनाचा ओढा
२४) तोफगाडी
२६) कणीकेची खीर
२७) सोनचाफा
३०) मत्स्य
३१) चांदणी
३२) शुद्ध, निर्दोष
३३) पाझर, आर्द्रता, रस
३४) एक पालेभाजी
३७) अथवा, किंवा
३८) व्यापारी फायदा
४०) गार
४२) आगामी काळ
४४) संपूर्ण
४६) पादत्राण
४७) छोटी लढाई
४९) खटला दाखल करणारा, चामड्याचा दोर
५०) बडबड्या
५२) बारा वर्षाचा काळ
५४) वजन, बोजा
५५) निमग्न, रममाण
५८) प्रामाणिक, सावकार
६०) पाय
६१) वस्ती
६४) तर्क, सुमार
६६) अरबी वर्ष
६७) याला
६९) मातीचा कण
७०) अग्नी
७२) दावानल
७३) सरसनीरस(भावना)
७५) वाळवी
७६) विशेष
७७) गाडीचे छत
७८) मज्जाव, बंदी

**उभे शब्द :-**
१) दाखला
२) उत्सव
३) कावळ्याचे ओरडणे
४) पुष्प
६) चलनवलन
७) जरब, दरारा, भय
८) भेकड, भित्रा
१०) दया माया नसलेला
११) अगदी अल्पप्रमाण दाखविणारा शब्द
१३) माराची उमटलेली खूण
१४) अलंकार
१८) दैव, कर्म
१९) कपाळावर चंद्र धारण केलेला
२०) एकटा, शिंपण
२१) वचक, भीती, धास्ती
२२) श्रवणेंद्रिय
२३) कावळा
२४) पृथ्वी
२५) गाणे गाणारा
२७) सोन्याचे अलंकार बनविणारा
२८) कानन
२९) हवा, वारा
३०) आईची बहीण
३१) वडील
३४) चालविणारा
३५) रंग
३६) निरंतर, न थांबता
३९) काडीमोड
४१) त्रास
४२) ब्राह्मण
४३) दुःख
४५) सत्ता
४६) क्रीडा
४७) झोंबणारे
४८) प्राणांतिक वेदना
४९) हवेचे आवरण
५१) गवत
५३) अर्धी ओंजळ
५६) मैत्री, प्रेम, तेल
५७) व्यापार, व्यवहार
५९) जाणेयेणे, राबता
६२) दागिना ** शृंगार
६३) शोध, माग
६४) आकडा,
६५) एक गळीत धान्य
६८) ठानवई
७१) उर्ध्व दिशा
७४) दारूचा एक प्रकार

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर





# गायकवाडांवरील हल्ल्याचा अमरावतीमध्येही निषेध

## मराठा सेवा संघाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.17 )-** अक्कलकोट येथे नियोजित कार्यक्रमासाठी गेलेल्या संभाजी ब्रिगेडचे नेते प्रवीण गायकवाड यांच्यावर भाजप पदाधिकारी व सराईत गुन्हेगार दीपक काटे आणि त्याच्या साथीदारांनी शाईफेक करत भ्याड हल्ला केला. या हल्ल्याचा तीव्र निषेध मराठा सेवा संघ, अमरावती यांच्यावतीने करण्यात आला असून, दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली. प्रविण गायकवाड हे फुले, शाहू, आंबेडकर यांच्यासारख्या थोर विचारवंतांचे विचार जनमानसात पोहोचविण्याचे कार्य सातत्याने करत आहेत. त्यांनी बहुजन समाजातील युवकांना स्वावलंबी बनवण्यासाठी आपले संपूर्ण जीवन वाहून घेतले आहे. अशा व्यक्तीवर हल्ला होणे हे पुरोगामी महाराष्ट्राला न शोभणारे असून, हा पूर्वनियोजित कट आहे, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. मराठा सेवा संघाने दिलेल्या निवेदनात, त्वरित आणि कठोर कारवाई न झाल्यास जनतेचा सरकारवरचा विश्वास ढासळेल, आणि याचे पूर्ण जबाबदारी शासनावर असेल, असा इशारा देण्यात आला आहे. निवेदन देताना मराठा सेवा संघाचे अरविंद गावडे, मनोहर कडू, अश्विन चौधरी, संजय ठाकरे, मंजू ठाकरे, रणजित तिडके, संजय ढोरे, सोपान भा. साबळे, संदीप वैद्य, शरद काळे, रावसाहेब वाटाणे, मनोज सोळंके, समीर नांदुरकर, प्राची नांदुरकर, याह्या पठाण, दिनकर काळे, अशोक कविटकर, संजय पाटील, प्रदीप पाटील, रवी मोहोड, निलेश सोनटक्के, संकेत गायकवाड, अजय लेंडे, गजानन टाले, गजानन कोरे, राजेंद्र अढाऊ, सुरेंद्र गावडे, हरिदास उल्हे, नितीन चौधरी, लोकेश म्हाला, अरविंद पागृत, मैथिली पाटील यांच्यासह इतर अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# मेळघाटात मुसळधार पाऊस, सिपना नदीला पूर

**प्रशासनाकडून पर्यटक, गावकऱ्यांना अलर्ट**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.17 )-** मेळघाटातील सातपुडा पर्वतरांगांमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे सिपना नदी दुथडी भरून वाहत असून, बुधवारी रात्रीपासून नदीला पूर आला आहे. त्यामुळे सेमाडोह, हरिसाल परिसरात प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला असून, नदीकाठच्या गावांना अलर्ट करण्यात आले आहे. सध्या सिपना नदीचा जोर प्रचंड असून, नागरिक व पर्यटकांनी नदीपात्राच्या आसपास न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सिपना नदीच्या विशाल पात्रालगत वसलेली हरिसाल व सेमाडोह ही गावे विशेष धोक्याच्या झोनमध्ये आली आहेत. प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्यास सांगितले असून, काही वर्षांपूर्वी झालेल्या पुराचा अनुभव लक्षात घेता, यंदाही पुनरावृत्ती होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या पावसाळी पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक मेळघाटात गर्दी करत असताना, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप तलखंडकर यांनी पर्यटकांना नदीकाठापासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.

# विश्व मांगल्य बालसभेच्या वतीने मातृ पूजन



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.17 ) -** येथील समर्थ कॉलनीत दि. 14 जुलै रोजी प्रतिभा मोहन राऊत यांच्या निवासस्थानी विश्व मांगल्य बालसभातर्फे मातृ पूजनाचा कार्यक्रम पार पडला. विश्व मांगल्य सभा ही महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्य करणारी राष्ट्रीय स्तरावरील संघटना असून, भारतीय संस्कृती व संस्कारांचे जतन, सुसंस्कृत व तेजस्वी माता घडवणे हे तिचे मुख्य उद्दिष्ट आहे. डॉ. वसुधा अनिल बोंडे यांच्या मार्गदर्शनाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बालकांवर चांगले संस्कार व्हावेत, मातृप्रेमाची जाणीव वृद्धिंगत व्हावी, या हेतूने मातृ पूजन पार पडले. प्रारंभी मातांच्या पायांना पाणी घालून पूजन करण्यात आले, त्यानंतर हळदकुंकू लावून त्यांचे आशीर्वाद घेण्यात आले. कार्यक्रमात सौ. सुनंदाताई मनोहर लाडविकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला मातृभक्त भगिनींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. सूत्रसंचालन शितल दत्ता गेडाम यांनी केले तर आभार प्रदर्शन कविता ठाकरे यांनी केले.

# कुरळी ग्रामपंचायतीत सरपंच व उपसरपंचांविरोधात अविश्वास प्रस्ताव मंजूर

**9 पैकी 6 सदस्यांचा अविश्वास प्रस्तावाला पाठिंबा**



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.17 )-** तालुक्यातील कुरळी ग्रामपंचायतीमध्ये मोठा राजकीय उलथापालथ घडली असून सरपंच दुर्गा कुकडे व उपसरपंच शोभा धामोडे यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेला अविश्वास प्रस्ताव बहुमताने मंजूर झाला आहे. त्यामुळे दोघांना पदावरून पायउतार व्हावे लागले आहे.कुरळी ग्रामपंचायतीमध्ये एकूण 9 सदस्य असून 7 जुलै रोजी सदस्य दिलीप साबळे व इतर सहा सदस्यांनी तहसील कार्यालयात अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. यावर सुनावणीसाठी 14 जुलै रोजी तहसील कार्यालयात बैठक घेण्यात आली. तहसीलदार रामदास शेळके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत सर्व सदस्य हजर होते.सदस्य नितीन कुकडे यांनी तोंडी अविश्वास प्रस्ताव मांडला, त्यास दिलीप साबळे यांनी अनुमोदन दिले. सरपंच व उपसरपंच यांनी लेखी उत्तर दिल्यानंतर मतदान प्रक्रिया पार पडली. यामध्ये 9 पैकी 6 सदस्यांनी अविश्वास प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले. त्यामुळे प्रस्ताव मंजूर झाला. या राजकीय घडामोडीमुळे कुरळीतील ग्रामराजकारणात चांगलीच खळबळ उडाली आहे.

# प्रविण गायकवाड यांच्यावरील हल्ल्याचा निषेध



**सर्वपक्षीय संघटनांकडून तहसीलदारांना निवेदन**

**आरोपींवर कठोर कारवाईची मागणी**

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.17 )** -संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे नियोजित कार्यक्रमासाठी जात असताना भाजप पदाधिकारी दीपक काटे व त्यांच्या साथीदारांनी शाईफेक करत भ्याड हल्ला केला. या हल्ल्याचा निषेध संपूर्ण राज्यात होत असून, त्याचे तीव्र पडसाद अंजनगाव सुर्जी तालुक्यातही उमटले.

दि. 16 रोजी अंजनगाव सुर्जी तहसील कार्यालयात तहसीलदार पुष्पा सोळंके (दाबेराव) यांना निवेदन देण्यात आले. या वेळी विविध पुरोगामी विचारधारेच्या संघटनांनी एकत्र येत आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

प्रविण गायकवाड हे फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचे प्रचारक असून, बहुजन समाजातील युवकांना स्वावलंबी बनवण्यासाठी कार्यरत आहेत. त्यांच्या सामाजिक कार्यामुळे असहिष्णू मानसिकतेच्या विरोधकांनी हा पूर्वनियोजित कट रचून त्यांच्यावर हल्ला केला, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. हा हल्ला केवळ व्यक्तीवर नसून, तो संविधानिक मूल्यांवर न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांच्यावर हल्ला आहे. राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री यांना संबोधित निवेदनात, हल्लेखोरांवर कठोर गुन्हे दाखल करून तत्काळ कारवाईची मागणी करण्यात आली. अन्यथा उद्भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नांना सरकार जबाबदार असेल, असा इशाराही देण्यात आला. यावेळी मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (उबाठा), बहुजन समाज पार्टी, कम्युनिस्ट पार्टी, तसेच तानूबाई बिर्जे पत्रकार परिषद यांच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून सरकार व हल्लेखोरांचा निषेध व्यक्त केला. उपस्थितांमध्ये प्रमोद दाळू, प्रदीप देशमुख, सीमा बोके, प्रदीप येवले, संदिपपाल महाराज, रामपाल महाराज, प्रा. प्रेमकुमार बोके, विकास येवले, महेश खारोडे, प्रवीण पेटकर, मिर्झा झहीर बेग, राजेश शिंगणे, शुभम बाळापुरे, बाळासाहेब गोंडचवर, रमेश सावळे, डॉ. विशाल देशमुख, गजानन धोटे, सतीश मानकर, सारिका मानकर, स्मिता घोगरे, विनोद सरदार, प्रदीप सातवटे, अरुण शेवाने, अशोक वानखडे, रविंद्र वानखडे, अमित गोंडचवर, आणि इतर अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# 15 वर्षे सत्ता उपभोगली, मग विकास कोणी थांबवला?

## कॉलनीच्या विकासावरून भाजपचे वैभव देशमुख यांचा विरोधकांवर घणाघात

**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे, ( दि.17 )**-जुना धामणगाव परिसरालगत असलेल्या कॉलनी भागाचा विकास गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्षित राहिल्याची तक्रार नागरिकांनी वेळोवेळी केली आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचे धामणगाव रेल्वे विधानसभा सोशल मीडिया प्रमुख वैभव देशमुख यांनी विरोधकांवर थेट हल्ला चढवत, विकासकामांच्या अंमलबजावणीत अपयशी ठरलेल्यांना जबाबदार धरले आहे.



देशमुख यांनी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वावर जोरदार प्रहार केला. 'धामणगाव रेल्वे मतदारसंघात काँग्रेसच्या माजी आमदार वीरेंद्र जगताप यांनी 15 वर्षे सत्ता उपभोगली. दोन वेळा जिल्हा परिषदेचे अध्यक्षही काँग्रेसचेच होते. तरीही कॉलनीचा विकास का झाला नाही, याचे उत्तर विरोधकांनी द्यावे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

देशमुख यांनी सांगितले की, या भागाचा सर्वांगीण विकास हे आमदार प्रताप अडसड यांचे प्राधान्य असून, त्यांच्या पुढाकारातून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. लवकरच आणखी निधी मिळवून रस्ते, नाले, पाणीपुरवठा आणि वीज व्यवस्थेसारख्या मूलभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत.

त्यांनी यावेळी ग्रामपंचायतीच्या निष्काळजी कारभारावरही ताशेरे ओढले. 'गेल्या 20-25 वर्षांपासून कॉलनी भागातून ग्रामपंचायतीला सर्वाधिक कर वसूल होतो, पण तरीही विकासाच्या बाबतीत हा भाग नेहमीच उपेक्षित राहिला. नागरिकांना पाण्यासारख्या अत्यावश्यक गोष्टींसाठीही संघर्ष करावा लागतो, हे दुर्दैवी आहे,' असे देशमुख म्हणाले.

त्यांनी हेही नमूद केले की, पूर्वी ले-आउट पूर्णपणे विकसित न करता नोंदवण्यात आले आणि त्यामुळे पायाभूत सुविधांचा मोठा अभाव निर्माण झाला आहे. 'यापुढे ग्रामपंचायतीने अशा चुकांची पुनरावृत्ती करू नये आणि केवळ पूर्ण विकसित ले-आउटच नोंदवावेत,' अशी जोरदार मागणी त्यांनी केली.

कॉलनीचा समावेश धामणगाव रेल्वे नगरपरिषदेच्या हद्दीत करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला असला, तरी स्थानिक राजकारणामुळे हा प्रस्ताव रखडल्याचा आरोप देशमुख यांनी केला. 'धामणगावसारखा विकास कॉलनीत व्हावा यासाठी नगरपरिषदेकडून पुढाकार घेतला आहे. पण स्थानिक राजकीय स्वार्थ विकासाच्या आड येत आहे. आता नागरिकांनी संघटित होऊन विकासासाठी आवाज उठवायला हवा,' असे त्यांनी आवाहन केले.

यावेळी 'आज जे विरोधक विकासाची मागणी करत आहेत, त्यांनीच सत्ताधाऱ्यांशी हातमिळवणी करून सत्तेचा लाभ घेतला होता. आता विकास न झाल्याची ओरड करत आहेत, म्हणजेच त्यांनी त्यांच्या अपयशाची कबुली दिली की काय? असा चिमटाही त्यांनी घेतला. 'धामणगाव रेल्वे आणि जुना धामणगाव परिसराचा सर्वांगीण विकास घडवण्याचा आमचा पूर्ण प्रयत्न आहे, आणि हे आमचे कर्तव्य आहे.' असा विश्वासही वैभव देशमुख यांनी यावेळी व्यक्त केला.

## डिजिटल जीवन प्रमाणपत्र अनिवार्य

**25 जुलै अंतिम मुदत**

**अमरावती-** इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ, विधवा व दिव्यांग यांसह केंद्र सरकारच्या सर्व सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभ मिळवण्यासाठी 'डिजिटल जीवन प्रमाणपत्र' अनिवार्य करण्यात आले आहे. हे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय लाभार्थ्यांना निधी दिला जाणार नाही.नुकत्याच पार पडलेल्या परफॉर्मन्स रिव्ह्यू कमिटीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार जुलै 2025 मध्ये सर्व लाभार्थ्यांनी 'बेनेफिशरी सत्यापण ?प'च्या माध्यमातून डिजिटल जीवन प्रमाणपत्र तयार करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र एकदा जनरेट झाल्यानंतर ते एनएसएपी पोर्टलवर अपडेट होईल आणि त्यानंतरच योजनेचा लाभ दिला जाईल. प्रमाणपत्र मिळवण्यासाठी लाभार्थ्यांनी तहसील कार्यालय, संजय गांधी योजना विभाग किंवा हयाती प्रमाणपत्र तयार करणाऱ्यांकडे संपर्क साधावा.

# राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत स्वरूप फसाटे जिल्ह्यातून चौथा



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.17 ) -** सत्र 2024-25 मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत आदर्श पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळेतील इयत्ता पाचवीचा विद्यार्थी स्वरूप शुभांगी रुपेश फसाटे याने उल्लेखनीय यश मिळवले आहे. त्याने अमरावती शहर व जिल्ह्यातून चौथा क्रमांक पटकावून गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे.स्वरूपचे हे यश अत्यंत प्रेरणादायी असून, त्याच्या अभ्यास, चिकाटी आणि शिस्तीचे प्रतिबिंब आहे. या यशासाठी त्याला शाळेतील शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे सतत प्रोत्साहन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल स्वरूप तसेच त्याचे आई-वडील यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. शाळेच्या वतीनेही त्याला उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. त्याच्या या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका रेणुका सोळंके, वर्गशिक्षिका किर्ती कोहळे, मार्गदर्शक शिक्षिका शितल केने, प्रिती बजाज, सोनाली पिंपळकर, अश्विनी कुलकर्णी, राधिका सिद्धभट्टी, रुपाली जोशी, भावना खडसे, पूजा देशमुख, तसेच कुटुंबातील आजोबा केशवराव फसाटे, आजी वनमाला फसाटे, मनोहराव टाकरखेडे, योगेश फसाटे, डॉ. कविता फसाटे, मंगेश फसाटे, पुनम फसाटे, अभिजीत टाकरखेडे, पल्लवी टाकरखेडे, विजया टाकरखेडे, निलेश बोडखे, अश्विनी बोडखे, मोरेश्वर (बंडू) मानेकर, नरेंद्र मोंढे आदींनी स्वरूपचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

## जाहीर नोटीस

**सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, ग्राम पंचायत चांडोळा ची मासिकसभा दि 30/05/ 2025 मध्ये श्री. सुरेश पुंडलिकराव मानकर रा.घुईखेड,ता दर्यापूर येथिल श्री शुभम सुरेशराव मानकर यांच्या उत्तरेस असलेली जागा वार्ड क्र.3 मधिल खुल्ली 42×25 चौ. फुट = 1050 चौफुट ही माझी असुन ती जागा 27.5 रेकार्ड वर चढविण्यात यावी यावर सभेने सुचविल्या सदर जागे बबत जर कुनाचा आक्षेप असल्यास पुराव्या सह 15 दिवसाच्या आत ग्रा.प. लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा तोंडी आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही.**

# मोर्शीतील चारगड प्रकल्पासाठी 564 कोटी 22 लाखांचा निधी मंजूर

**आ. उमेश यावलकर यांच्या प्रयत्नांना यश**

**9 गावांतील 1680 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली**



## मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना होणार लाभ

या प्रकल्पाच्या निधीमुळे मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार असून, शेतीसाठी आवश्यक असलेला पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. बोडणा गावाच्या पुनर्वसनासाठीही स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आली आहे. या ऐतिहासिक यशासाठी शेतकऱ्यांनी आमदार उमेश यावलकर यांचे आभार मानले असून, आ. यावलकर यांनी देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री बावनकुळे व जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांचे मन:पूर्वक आभार मानले आहेत.

**महासागर प्रतिनिधी**
**वरूड/मोर्शी,( दि.17 ) -** दीर्घकाळ रखडलेल्या निम्न चारगड प्रकल्पाला अखेर 564 कोटी 22 लाख रुपयांचा सुधारीत निधी मिळाल्यामुळे वरूड-मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. या प्रकल्पामुळे तब्बल 9 गावांतील सुमारे 1680 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून, जलसिंचनाच्या माध्यमातून शेतीसमस्या कायमस्वरूपी सोडवली जाणार आहे.

1999 साली वरूड-मोर्शी मतदारसंघ ड्रायझोन म्हणून घोषित झाला होता. या निर्णयामुळे या भागावर दुष्काळाची छाया कायम राहिली होती. मात्र आमदार उमेश यावलकर यांनी या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवले. डिसेंबर 2024 मधील हिवाळी अधिवेशनात त्यांनी चारगड प्रकल्पाच्या निधीसंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध संबंधित खात्यांमध्ये बैठकांचे सत्र सुरू झाले. 7 जानेवारी 2025 रोजी नागपूर येथे पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीपासून प्रक्रियेला गती मिळाली. या बैठकीत पंढरी माध्यम, पाक नदी, चांदस-वाठोडा व चारगड प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली 21 फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीत रखडलेल्या कामांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे आदेश देण्यात आले. त्यानंतर 26 जून रोजी अमरावती येथील सिंचन सेवा भवनात झालेल्या बैठकीत बोडणा गावाच्या पुनर्वसनासह अन्य भूसंपादन विषयांवर सविस्तर चर्चा झाली. त्या अनुषंगाने 10 जुलै रोजी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडून चारगड प्रकल्पाला सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

